**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.११ सन २०१७/१८**

शनिवार, दिनांक ०६/०१/२०१८

================ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ================

## कार्यवृत्तांत

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची सभा शनिवार, दिनांक ०६/०१/२०१८ इ. रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाण आहे.

**हजर सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. शौमिका अमल महाडिक | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील | सदस्य |
| ३. | मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरीडकर) | सदस्य |
| ४. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | सदस्य |
| ५. | मा.शुभांगी रामचंद्र शिंदे | सदस्य |
| ६. | मा.विशांत सुरेश महापुरे | सदस्य |
| ७. | मा.जयवंत गुंडोपंत शिंपी | सदस्य |
| ८. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य |
| ९. | मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक निंबाळकर | सदस्य |
| १०. | मा.राहुल प्रकाश आवाडे | सदस्य |
| ११. | मा.कल्लाप्पा सतुराम भोगन | सदस्य |
| १२. | मा.संध्याराणी विलास बेडगे | सदस्य |

येणेप्रमाणे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.पदाधिकारी, मा.समिती सदस्य व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.प्रकल्प संचालक तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ):-** आजच्या स्थायी सभेस उपस्थित असलेले सर्व सन्मा. पदाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व समिती सदस्य, सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करतो. शिंगणापूर येथिल क्रिडा प्रशालेस व्यायाम साहित्य व खेळाचे साहित्य घेणेकामी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाकडून मदत दिली जात आहे याबाबत मा.महेश जाधव, अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळ व सदर देवस्थान समिती कडील उपस्थित सन्मा. सदस्य या सर्वांचे प्रथमता मी जिल्हा परिषद, कोल्हापूरच्या वतीने स्वागत करतो.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** शिंगणापूर येथील क्रिडा प्रशालेस पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाकडून व्यायाम साहित्य व खेळाचे साहित्य घेणेकामी र.रु.३.०० लक्ष इतकी मदत देणेत येत आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाचे अध्यक्ष मा.महेश जाधव, सदस्य मा. संगिता खाडे, मा.विजय पोवार, मा. शिवाजीराव जाधव, इत्यादी सदस्य सभागृहात उपस्थित आहेत त्यांना मानपत्र देवून मा. अध्यक्ष जि.प, मा.पदाधिकारी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व स्थायी समिती सदस्य यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करावा अशी विनंती करतो.

**मा.मु.का.अ.:-**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाकडून हा एक अंत्यत चांगला उपक्रम आहे.पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाचे अध्यक्ष मा.महेश जाधव व सन्मा.सदस्य यांनी मा.अध्यक्ष, जि.प. कोल्हापूर यांच्याकडे र.रु.३.०० लक्ष एवढया मदतीचा धनादेश सूपुर्द केला. यानंतर सभागृहाच्या वतीने मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व समिती सभापती,

मा.मु.का.अ.व सन्मा सदस्य यांच्या शुभहस्ते पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाचे अध्यक्ष मा.महेश जाधव, सदस्य मा. संगिता खाडे, मा.विजय पोवार, मा. शिवाजीराव जाधव यांचा सत्कार करणेत आला.

**सचिव :-** जीवनदान महिला बहुउदेदशिय सेवाभावी संस्था कोल्हापूर यांचे मार्फत संपूर्ण जिल्हयात सरपंचाना मोफत प्रशिक्षण देणेत येणार आहे.

**मा.मु.का.अ.:-** उच्च शिक्षीत तालुक्यामध्ये सरपंच / उपसरंपच / ग्राम विकास अधिकारी यांना सदरचे प्रशिक्षण यासंस्थेमार्फत देणेत येणार आहे. आजच्या सभेस आजच्या सभेमध्ये त्यांचे अभिनंदन करूया.

तदनंतर संस्थेच्या सेक्रेटरी कुमारी सुवासिनी भिमराव कांबळे यानी याप्रशिक्षणाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर संस्थेच्या अध्यक्षा सौ.राजश्री मधुकर कांबळे ,संस्थेच्या सेक्रेटरी-सौ.सुवासिनी भिमराव कांबळे व पर्यावरण तज्ञ कुमारी संपना मारुती मांगले यांचा पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले

**मा.जयवंतराव शिंपी:-**आजच्या स्थायी समिती सभेस कोणकोण अधिकारी अनुउपस्थित आहेत याचा आढावा घ्या.

**सचिव:-**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशिक्षणासाठी गेले आहेत, कार्यकारी अभियंता (PMGSY) हे हजर नाहीत.

**मा.अरुणराव इंगवले:-** कार्यकारी अभियंता (PMGSY) स्थायी समिती सभेस कधीही हजर रहात नाहीत. कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे),वन विभागाचे अधिकारी सभेस उपस्थित नाहीत. वरिष्ठ भुवैज्ञानिक इ. अधिकारी नाहीत.

**मा.मु.का.अ :-** त्यांना पुढील मिटींगला बोलवा.

**मा.अरुणराव इंगवले:-** एस.टी. महामंडळाचे अधिकारी सुध्दा बोलवा.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** नांदणी येथील मठाधिपती यांचे निधन झाले आहे त्यांचा दुखवटयाचा ठराव घ्यावा.

**दुखवटयाचा ठराव :-**

**ठराव क्र:-२५८** **दिनांक -६.१.२०१८**

नांदणी ता.शिरोळ जि.कोल्हापूर येथील जैन मठाचे मठाधिपती स्वस्तिश्री जिनसेन भटटारक पटटाचार्य महास्वामी यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी दिनांक २१.१२.२०१७ इ.रोजी अकस्मीक निधन झाले आहे.त्यांनी जैन धर्मप्रचार,अनेक प्राचीन मंदिरांचा जीर्णोदार केला आहे.नांदणी मठाची प्रगती आणि नावलौकिक वाढविण्यामध्ये स्वामीजी यांचे खुप मोठे योगदान आहे.जिनसेन महास्वामींच्या रुपाने शांत,संयमी,अभ्यासू व निगर्वी अशा त्याग मुर्तीस जैन समाज मुकला आहे. त्यांच्या मृतात्म्यास सभागृहाच्यावतीने दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रंध्दाजली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव पारीत करणेत आला.

सुचक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर

अनुमोदक :- मा.सौ.शुभांगी रामचंद्र शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.अरुणराव इंगवले:-** माजी.मंत्री. मा. जयंत पाटील यांच्या मातोश्रींचे निधन झाले आहे या बाबत दुखवटयाचा ठराव घ्यावा. तसेच निवडे ता. गगनबावडा व चिखली ता.कागल प्रा.आ. केंद्राचा केंद्र शासनाचा विशेष सत्कार करणेत आला सदर दोन्ही प्रा.आ.केंद्राकडील वैधकिय अधिकारी व कर्मचारी यांचा अभिनंदनाचा ठराव घेणेत यावा हि विनंती.

**दुखवटयाचा ठराव :-**

**ठराव क्र:-२५९** **दिनांक -६.१.२०१८**

माजी मंत्री,आमदार जयंत पाटील यांच्या मातोश्री श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी ब्रीच कँडी रुग्णालय मुंबई येथे उपचार सुरु असताना दिनांक २९.१२.२०१७ इ.रोजी निधन झाले.त्यांनी कै.राजारामबापू पाटील यांच्या राजकिय व सामाजिक वाटचालीत मोलाची साथ दिली.कै.राजारामबापू पाटील यांच्या अकाली निधनानंतर त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुंटूब सावरण्याची जबाबदारी पार पाडली

आहे.त्यांच्या मृतात्म्यास सभागृहाच्यावतीने दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रंध्दाजली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव पारीत करणेत आला.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**अभिनंदनाचा ठराव :-**

**ठराव क्र:- २६०** **दिनांक - ६.१.२०१८**

चिखली ता.कागल व निवडे ता.गगनबावडा येथिल प्राथमिक आरोग्य केद्रांना केंद्र शासनाचे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन प्राप्त झाले आहे.या दोन्ही प्राथमिक आरोग्य केद्रांकडील वैदयकिय अधिकारी व सर्व कर्मचारी यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे हे शक्य झाले आहे.याबाबत सभागृहामध्ये चर्चा होवून जिल्हास्तरावरील व तालुकास्तरावरील सर्व संबधीत अधिकारी,कर्मचारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वैदयकिय अधिकारी व सर्व कर्मचारी यासर्वाचे सभागृहामध्ये अभिनंदन करुन तसा ठराव पारीत करणेत आला.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.कलाप्पा सतूराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.मु.का.अ.:-** प्लास्टीक वापरावर बंदी व ओला कचरा व सुखा कचरा या बाबत सविस्त मार्गदर्शन केले.

**विषय क्र.१ :- महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** दर्जोन्नती प्रजिमा झालेल्या मार्गाची माहिति देणेत आली

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** दि.१८/१२/२०१७ प्रा.शाळा स्तरावरील बायोमेट्रीक हजेरी प्रणाली बंद बाबत प्राप्त परिपत्रकाचे वाचन केले.

**सचिव:-** वृक्ष लागवडी बाबत माहिती देणेत आली.

**मा.अरुणराव इंगवले:-** एक वेळ झाडांची संख्या कमी करा पण झाडांना लोखंडी / सिमेंट संरक्षक ट्री गार्ड बसविणेत यावे.

**मा.राहुल आवाडे:-** वृक्ष लागवडी अंतर्गत छोटी झाडे टिकत नाहीत त्याऐवजी मोठी झाडे लावणेत यावीत.

**मा.मु.का.अ.:-** मोठी झाडे खाजगी नर्सरी मध्ये बुक केली आहेत.

**मा.राहुल आवाडे:-** सन २०१९ ला वृक्ष लागवडीबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. सातारा- कोल्हापूर महामार्गावर बोगनवेल झाडे लावलेली आहेत व ती ट्रीगार्ड मुळे टिकलेली आहेत.

**मा.मु.का.अ.:-** वृक्ष लागवाडीबाबत सुयोग्य नियोजन करू.

**मा.अरुणराव इंगवले :-** आळते व धुळोबा रोड येथे लावलेल्या झाडापैकी एकही झाड जगलेले नाही. त्यांना संरक्षण देणे आवश्यक होते.

**मा.राहुल आवाडे:-** घोडावत उदयोग समुहाकडून लावणेत आलेली झाडे मोठी व ट्रीगार्ड असलेने चांगली वाढलेली आहेत.

**मा.मु.का.अ.:-** मा.अध्यक्ष व सर्व पदाधिकारी व अधिकारी / कर्मचारी आपन याबाबत योग्य नियोजन करूया.

**सचिव :-** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) या पदावर श्री.एस.डी रसाळ हे नव्याने हजर झाले आहेत, त्यांचे अभिनंदन करुया.

**उप मुकाअ (मबाक) :-** मी दिनांक १.१.२०१८ रोजी कोल्हापूर जि प कडे हजर झालो आहे. यापूर्वी मी सिधुदुर्ग जिल्हा परिषदेकडे उप मुकाअ (मबाक) या पदावर कार्यरत होतो.सर्वाना सहकार्य करुन चांगल्या प्रकारे महिला बालकल्याण विभागाच्या योजना राबविल्या जातील यांची मी हमी देतो.

यानंतर मा.अध्यक्ष जि.प यांचे हस्ते श्री.रसाळ साहेब यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करणेत आले.

**मा.अरुण इंगवले :-** मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष,मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगू इच्छितो कि, समाजकल्याण अधिकारी हे जिल्हा परिषदेचे पद तांतडीने भरणे आवश्यक आहे.तेथिल कर्मचारी व कामाचा व्याप हा सुध्दा बघा. ब-याच विभागामध्ये कर्मचा-यांची संख्या अपुरी असलेमुळे कामात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यामध्ये समानता आली पाहीजे.

**मा.राहुल आवाडे :-** शिक्षण,आरोग्य,पशुसंवर्धन या विभागामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची बरीचशी पदे रिक्त आहेत व यांचा कामकाजावर परिणाम होतो.शक्य असेल तर कॉन्ट्रक्टर बेसीसवर ही पदे भरा.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** याबाबत आंतरजिल्हा बदलीने येणारे शिक्षक किंवा नवीन शिक्षक भरती हे दोनच पर्याय आहेत.

**मा.राहुल आवाडे :-** शैक्षणिक वर्षाचा विचार करता,नाताळ सुटटीनंतर फक्त २५ टक्के एवढाच कालावधी शिल्लक राहीला असून बहुतांश शिक्षकांची पदे रिक्त असलेने मुलांच्या भवितव्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**मा.अरुण इंगवले:-** नवीन आकतीबंधाप्रमाणे आवश्यक शिक्षक संख्या व सध्या कार्यरत शिक्षक यांचा आढावा घेणे गरजेचे आहे.या प्रक्रियेमध्ये समानीकरण करणे गरजेचे आहे.याबाबत एकदा शिक्षणधिकारी प्राथमिक यांनी सविस्तर आढावा दयावा.

**मा.मु.का.अ :-** याबाबत शासनास वेळोवेळी माहीती सादर केली जाते.

**मा.राहुल आवाडे :-** वैदकिय अधिकारी व पशुसंवर्धन अधिकारी नसलेने फारच अडचणी निर्माण झालेल्या आहेत.सदरची पदे उपलब्ध करुन देणेचे गरजेचे आहे.

**शिक्षण अधिकारी (प्राथमिक) :-** शाळा एंकत्रिकरणाबाबत माहीती प्राप्त करुन घेतली असून साधारण अशा ७० शाळा आहेत.१५० पटाला मुख्याध्यापक पद ठेवून यामुळे अतिरिक्त असलेले शिक्षक आवश्यक त्याठिकाणी दिले जातील.

**मा.सभापती (शिक्षण) :-** हा समितीचा निर्णय नाही.याबाबत शिक्षण समितीमध्ये धोरण ठरले पाहीजे.

**मा.अरुणराव इंगवले :-** १०० पट शाळा असे धोरण ठरवु या.कन्या व कुमार शाळा एकत्रित करुया.

**मा.राहुल आवाडे :-** हुपरी येथिल जि प च्या शाळेचे ७ वर्ग नगरपालीकेकडे वर्ग करावयाचे आहेत.खाजगी शाळांमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या कमी होत आहे.वर्गातील मुंलामुंलीचे एकत्रिकरण करणे गरजेचे आहे.

**मा.सभापती (शिक्षण) :-** याबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**मा.मु.का.अ :-** योग्य धोरण ठरवून निर्णय घेता येईल.

**मा.अरुणराव इंगवले :-** यापूर्वी मा.अध्यक्ष यांचेकडे काम केलेले सेवानिवृत परिचर भेटले .त्यांना अदयापी रजा रोखीकरणाचे पैसे मिळालेले नाहीत.याप्रकरणांची वस्तुस्थिती बघून तातडीने कार्यवाही करा.

**विषय क्र.२ :- विषय समिती मधील घेणेत आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र.३ :- सामान्य प्रशासन विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया माहे सप्टेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१७ अखेरच्या लेखा विषयक नोंदवहया पुर्ण / अपुर्ण असले बाबत अवलोकन करणे. (सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र.२६१** **दिनांक - ०६/०१/२०१८**

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील सप्टेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१७ अखेरच्या नोंदवहया पुर्ण / अपुर्ण लेखा विषय नोंदवहया खालील प्रमाणे अवलोकनी येवुन मंजूरी मिळणे विषय विनंती आहे.

| अ.नं. | नमुना नं. | नोंदवही क्रमांक व तपशिल | कर्मचाऱ्याचे नांव | पूर्ण | अपुर्ण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | धनादेश प्राप्त नोंदवही (संबधितांकडील सर्व योजनांची व खात्यांची) | श्री.रजनीकांत कांबळे<br>श्री.मधुकर आंधारे | पूर्ण | |
| २ | ७ | जनरल रोजकिर्द (संबधितांकडील सर्व योजनांची | श्री.रजनीकांत कांबळे | पूर्ण | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | व खात्यांची) | | | |
| ३ | ६ | जामिन कदबा नोंदवही | श्री.रजनीकांत कांबळे | पूर्ण | |
| ४ | ४ | पेटी कॅशबुक | श्री.रजनीकांत कांबळे | | |
| ५ | ३० | आकस्मिक खर्च नोंदवही | श्री.मधुकर आंधारे | पूर्ण | |
| ६ | १४ | खर्च नोंदवही | श्री.रजनीकांत कांबळे<br>श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| ७ | ३२ | जंगम मालमत्ता नोंदवही | श्री.मधुकर आंधारे | पूर्ण | |
| ८ | ३७ | वाहन नोंदवही लॉगबुक | श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| ९ | ३७ | वाहन हिस्ट्री बुक | श्री.निलेश म्हाळूंगेकर | पूर्ण | |
| १० | ३३ | साठा रजिस्टर | श्री.मधुकर आंधारे | पूर्ण | |

वरील प्रमाणे नोंदवहया पूर्ण असून सदरच्या विषयास मंजूरी देणेत आली.

सुचक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४ :-श्रीम.एस.आर.नरवाडकर, सेवा निवृत्त बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.प्रकल्प, आजरा यांच्या शिल्लक अर्जित रजेचे रोखीकरणास मान्यता मिळणे बाबत. (महिला व बाल कल्याण)**
**ठराव क्र. २६२** **दिनांक - ०६/०१/२०१८**

श्रीम.शमा राजीव नरवाडकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी, बाल विकास प्रकल्प आजरा या पदावर कार्यरत होत्या. त्यांनी दिनांक ३१/०१/२०१७ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली. त्यावेळी त्यांच्या सेवापुस्तकी २११ दिवस इतक्या अर्जित रजा शिल्लक आहेत.

श्रीम. नरवाडकर यांचे स्वेच्छा सेवा निवृत्ती समयी त्यांचे रजा खात्यावर एकूण २११ दिवस अर्जित रजा शिल्लक असलेने त्यांचे दिनांक ३०/११/२०१७ चे विनंती अर्जाप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम १०९ (३) (ड) अन्वये मा.स्थायी समितीस असलेल्या अधिकारानुसार श्रीम.शमा राजीव नरवाडकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी, बाल विकास प्रकल्प आजरा यांची २११ दिवसाचे अर्जित रजा रोखिकरणास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ :- राज्य दरसुची (SSR) सन २०१७-१८ / रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाशी संबंधीत बाबी राज्य दरसुचीत समाविष्ठ करण्या बाबत.(बांधकाम)**
**ठराव क्र. २६३** **दिनांक - ०६/०१/२०१८**

शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २०१७-१८ ची मंजूर राज्य दरसुचीस दि.२२/९/२०१७ पासून वापरणेस दि.४/१०/२०१७ च्या स्थायी समिती सभेची मान्यता देणेत आलेली आहे.मा. मुख्य अभियंता, मुंबई ( सा.बां. ) प्रादेशिक विभाग यांचेकडील जा.क्र.मुअ(मुं)प्रशा/इमारती/का-२(१) ५६६५ दि.२९/११/२०१७ अन्वये राज्य दरसूची (SSR) सन २०१७-१८ / रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाशी संबंधीत बाबी राज्य दरसूचीत समाविष्ठ करण्यात आल्या आहेत व मा. मुख्य अभियंता, (विद्युत) मुंबई सा.बां. विभाग यांचेकडील जा.क्र. मुअ(विं) /का-३/२६६०/२०१७ दि. ७/११/२०१७ च्या पत्रानुसार विद्युत विभागाची सन २०१७-१८ (वस्तु व सेवा करविरहित) दरसुची नव्याने प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर नव्याने अंतर्भुत करण्यात आलेल्या बाबींचा

तपशिल व दर तसेच विद्युत विभागाची दरसुची कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील विकास कामांना लागू करणे आवश्यक आहेत.

त्यानुसार वरील बाबीस अनुसरून सोबत जोडलेल्या सा.बां. विभागाकडून प्राप्त सुधारणा बाबीचे दर, दि.२९/११/२०१७ पासून व विद्युत विभागाची दरसुची दि. ७/११/२०१७ पासून जिल्हा परिषदेच्या बांधकाम व विकास कामांना लागू करणे बाबत स्थायी समिती सभेची मंजूरी मिळणेकामी विषय दाखल करणेत आला होता. याबाबत सभागृहामध्ये चर्चा होऊन वरील बाबीस अनुसरून सदर नव्याने अंतर्भुत करण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाशी संबंधीत बाबींचा तपशिल व दर दि.२९/११/२०१७ पासून व विद्युत विभागाची दरसुची दि. ७/११/२०१७ पासून कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम व विकास कामांना लागू करणेस स्थायी समितीची मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.६ :- माहे आक्टोंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१७ ची जमा व खर्चाची प्रपत्र मंजुरी बाबत. (अर्थ विभाग)**

**ठराव क्र. २६४** **दिनांक - ०६/०१/२०१८**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे आक्टोंबर २०१७ व माहे नोव्हेंबर २०१७ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करण्यात आली. वित्त समितीने अनुक्रमे दिनांक ०५/१२/२०१७ व दिनांक ०३/०१/२०१८ ने केले शिफारशीनुसार त्यास मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.राहुल आवाडे :-** समाजकल्याण विभागांकडून राबविणेत येणा-या योजना व निधी याचा कोणत्या सदस्यांना किती लाभ देणेत आला ? शासन निर्णयाप्रमाणे ५००० लोकसंख्या निकष असलेने का लाभ मिळत नाही ?

**मा.अरुणराव इंगवले :-** जनसुविधा / नागरी सुविधा योजनेचे कसे आहे ?

**मा.सचिव-** पाहून सांगतो.

**मा.अरुणराव इंगवले :-** सदस्य कोठेही देवू शकतो.

**मा.मु.का.अ :-** चेक करुन घेतो.

**मा.राहुल आवाडे :-**जि.प सदस्यांनी नांवे सुचविणेस काय अडचण आहे ? ५००० लोकसंख्येच्या बाबतीत मी पत्र देतो.मला माहीती दयावी.समाज कल्याण विभांगाची काय धोरणे आहेत.

**मा.अरुणराव इंगवले :-** यादी कधी होणार ? यावेळी व्यवस्थित करा.

तदनंतर सौरउर्जा बचत बाबत सादरीकरण करणेत आले.व पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

मा.राहुल आवाडे **:-** आपण गडहिंग्लज का प्रपोज करीत आहात.ही जुनी टेक्नॉलॉजी व आऊटडेटेड आहे.

**मा.मु.का.अ :-** आपण चेक करुन घेवुया.

**विषय क्र.७ :- महसुलात जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत ठेवीची रक्कम मागणी केल्यामुळे परत करण्या बाबत. (बांधकाम)**

**ठराव क्र.२६५** **दिनांक - ०६/०१/२०१८**

खाली नमुद कामांची व्यपगत अनामत मक्तेदार यानी मागणी केली असुन त्या संबंधीची तसेच प्रस्तुत रक्कम महसुल खाती जमा केली असले बाबत खातरजमा केली आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | कामाचे नाव | ठेकेदार | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे बुराणवाडी (बर्की)ता. शाहुवाडी येथ् व्यायामशाळा इमारत बांधणे | श्री. महादेव आनंदा पाटील रा. पिशवी ता. शाहुवाडी | २५४९४/- | |
| २ | मौजे शेंबवणे (धुमकवाडी)ता. शाहुवाडी येथ् व्यायामशाळा इमारत बांधणे | श्री. महादेव आनंदा पाटील रा. पिशवी ता. शाहुवाडी | १५१०१/- | |
| ३ | मौजे लिंगनुर नुल ता. गडहिंगलज अंतर्गत रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे | श्री. चे. दौलत मजूर सह. संस्था कडगावता. गडहिंगलज | ५०००/- | |
| ४ | मौजे.बावेली ता गगन बावडा येथ् सामाजिक सभागृह बांधणे | श्री. कासीम उस्माण पाटणकर रा. तिसंगी ता. ग.बावडा | २२२७३/- | |
| ५ | मौजे.भादोले ता. हातणंगले अंतर्गत रस्ते खडीकरण डांबरीकरण करणे | श्री. घंनंजय बाबासो सवदती रा.कोल्हापूर | २०९८४/- | |
| ६ | गडहिंगलज येथ्ील नविन प्रशासकीय इमारतीकडे जाणारा रसता तयार करणे | श्री.बी.बी. लोंढे हसूरचंपू ता. गडहिंगलज | ४९९२६/- | |

वरील कामांची रक्कम ही तीन वर्षाखालील हक्क न सांगितलेल्या प्रलंबीत ठेवी या सदराखाली राहील्याने महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९ (७) तीन नुसार व्यपगत ठेवी म्हणून जिल्हा परिषद जमा खाती घेतली आहे. वरील मक्तेदार यांचा या रक्कमेवर हक्क असुन महा.जि.प. व पं.स. लेखासंहिता नियम १९६८ मधील नियम २०९(८) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने त्यांना रक्कम आदा करता येते.

सदरचा प्रस्ताव अवलोकनी येऊन बांधकाम समितीचे दि.२२.११.२०१७ चे शिफारशी प्रमाणे संबंधीत मक्तेदाराना अनामत रक्कम आदा करणेस स्थायी समितीची मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी

अनुमोदक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.८ :- मौजे भडगाव ता.कागल कडील प्राथमिक शाळेच्या आवारातील पिण्याच्या पाण्याची टाकी निर्लेखन करणे बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २६६** **दिनांक - ०६/०१/२०१८**

ग्रामपंचायत मौजे भडगांव, ता. कागल कडील पिण्याच्या पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत भडगांव, ता. कागल यांनी दि. ०२/०६/२०१७ रोजी पंचायत समिती कागलकडे सादर केलेला आहे.

सदर पाण्याची टाकी **सन १९८०** मध्ये बांधलेली असून सद्या त्या टाकीस ३७ वर्षे पुर्ण झालेले असून सदर टाकीतून पाणी पुरवठा बंद आहे. सध्या पर्यायी **राष्ट्रिय ग्रामिण पेयजल योजनेतून गावास पाणी पुरवठा चालू आहे.** सदर टाकीचे कॉलम बेस स्लॅब, बॉटम स्लॅब बीम व टाकीचे स्टील गंजलेले असून क्रॅक पडलेली आहे. सदरची टाकी प्राथमिक शाळेच्या आवारात असून टाकी पडून जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. सदरची पाण्याची टाकीचे निर्लेखन करून टाकी उतरविणेबाबत ग्राम पंचायत भडगांव कडील मासिक सभा ठराव क्र.१२/१, दि. १४/०८/२०१५ व ग्राम सभा ठराव क्रमांक १४/२, दिनांक १५/०८/२०१५ ने ठराव पारित केलेला आहे. तसेच पंचायत समितीने ठराव क्र. ०१, दि.०१/०४/२०१७ ने टाकी निर्लेखन करून उतरविणेबाबत ठराव पारित केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी प्रस्तुत विषयी शिफारस केलेली आहे. मौजे भडगांव, ता. कागलकडील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत विहित कार्यपध्दती

अवलंबणार असलेने व नियमानुसार निर्लेखनाची कार्यवाही करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.राहुल आवाडे :-** कबनूर मतदार सघांतील जि.प सदस्या सौ.विजया पाटील यांना अपात्र ठरल्या असताना सुध्दा सभेसाठी बोलाविले जाते.तसेच सभा कामकाजात सुध्दा त्यांनी भाग घेतला आहे.
**मा.अरुणराव इंगवले :-** याबाबत जिल्हा परिषदेला आदेश आलेला नाही.
**मा.राहुल आवाडे :-** न्यायालयाच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली आहे.त्यांचा जातीचा दाखला जमा करणे बाबत कोर्टाचा आदेश आहे.तरी सुध्दा त्यांना जि.प सभेसाठी बोलाविले.
**सचिव:-** प्राप्त झालेले सर्व कागदपत्रे मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना सदर केली आहेत.मा.उच्च न्यायालयात त्याची सुनावणी सुरु आहे.
**मा.राहुल आवाडे :-** उच्च न्यायालयाचा निर्णय दिल्यावर मा.जिल्हाधिकारी यांनी आदेश दिला पाहीजे.पण सुनावणी ठेवली आहे.
**मा.मु.का.अ :-** मा.जिल्हाधिकारी यांनी सुनावणी ठेवली आहे.
**मा.राहुल आवाडे :-** तुम्हांला माहीती असून सुध्दा तुम्ही ही बाब दुर्लक्षित केली आहे.
**मा.अरुणराव इंगवले:-**हा मा.जिल्हाधिकारी यांचा अधिकार आहे.तुम्ही जिल्हाधिकारी यांना विचारा.
**मा.राहुल आवाडे :-** कार्यवाही का झाली नाही ? चुकीचे ठराव घेवून निर्दोष लोकांचेवर कार्यवाही होत आहे.आम्ही उपोषणला बसु काय ?
**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर:-** साजणी येथील गैरव्यवहाराच्या प्रकरणांचे पुढे काय झाले ?
**मा.मु.का.अ :-** साजणी बाबत तंटामुक्त महाजल योजनेबाबत तक्रार आहे.
**मा.राहुल आवाडे :-**याप्रकरणी दोन सरपंचाना दोषी धरले आहे.यामध्ये फरास यांचेवर कार्यवाही केली गेली.
**मा.मु.का.अ :-**असे झालेली नाही.सुनावणी घेवून कार्यवाही करणेत आलेली आहे.वसुली सोबतच FIR होईल.
**मा.राहुल आवाडे :-** काम पूर्ण झालेले आहे .फरासने पैसे भरलेले नाहीत त्यांचेकडून वसुली काढणेत आली आहे.
**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर:-** फरासने पैसे भरलेले आहेत.
**मा.मु.का.अ :-** याकामी गटविकास अधिकारी यांनी FIR दाखल करावा.
**मा.राहुल आवाडे -** कबनूर व साजणी येथिल या प्रकरणाबाबत दुजाभाव न करता नियमाप्रमाणे दोषी असलेल्या संबधितावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली पाहीजे.
**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर:-** कबनूर व साजणी यादोन्ही गैरव्यवहारांच्या प्रकरणांची नियमाप्रमाणे सर्व संबधितावर कारवाई करुन याचा सविस्तर अहवाल दयावा.
**मा.राहुल आवाडे :-** समन्यायी कारवाई करा व अहवाल दया.

**विषय क्र.९ :- ग्रा.पं. निवडे ता.पन्हाळा कडील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २६७ दिनांक - ०६/०१/२०१८**

ग्रामपंचायत निवडे, ता. पन्हाळा कडील ग्रामपंचायत मालकीची मिळकत नं १५७ मधील ग्रामपंचायत इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रा.पं. निवडे, ता. पन्हाळा यांचेकडून दि. ३०/०३/२०१७ रोजी गट विकास अधिकारी, पं.स. पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेकडे दि. ०१/०१/२०१८ रोजी निर्लेखन शिफारस प्रस्ताव सादर झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९९०-०९ साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारतीच्या दगडी भिंतीला तडे गेलेले आहेत व कौलारू रूफकाम खराब झालेले आहे. याबाबत ग्रामपंचायत निवडेने इमारत निर्लेखन करणेबाबतचा ग्रामसभा ठराव क्र.४१, दि. १४/०३/२०१७ व मासिक सभा ठराव क्रं.९२ दि. २८/०२/२०१७ रोजीने ठराव पारीत केलेला आहे.तसेच पं.स. पन्हाळा कडील मासिक सभा दि. ०४/०८/२०१७ ठराव क्र. ६६ ने सदरची इमारत निर्लेखन करणेस मान्यता दिलेली आहे.

कार्यकारी अभियंता,(बांधकाम विभाग), जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या दगडी भिंतीना भेगा पडल्या आहेत व कौलारू रुफकाम खराब झालेले असून बांधकाम भविष्यात धोकादायक झालेने ते निर्लेखन करणेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. निर्लेखनानंतर जुन्या साहीत्याचा लिलाव करून ती रक्कम ग्रामपंचायत फंडात जमा करणेत येणार आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सा. बां. विभाग, कोल्हापूर यांचेकडून सदर बांधकाम भविष्यात कार्यालयीन वापरास अयोग्य असलेबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल जा.क्र. रेशा/७२४६/२०१७,दि. १५/१२/२०१७ ने कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे सादर केलेला आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत निवडे, ता. पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरचे निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.सौ.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१० :- ग्रा.पं. गोलिवडे ता.पन्हाळा कडील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन बाबत. (ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २६८** **दिनांक - ०६/०१/२०१८**

ग्रामपंचायत गोलिवडे, ता. पन्हाळा कडील ग्रामपंचायत मालकीची मिळकत नं ४३ मधील ग्रामपंचायत इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रा.पं.गोलिवडे, ता. पन्हाळा यांचेकडून दि. २०/०२/२०१४ रोजी गट विकास अधिकारी, पं.स. पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेकडे दि. ०२/०१/२०१८ रोजी निर्लेखन शिफारस प्रस्ताव सादर झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत **सन १९८४** साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारतीच्या भिंतीला तडे गेलेले आहेत व रूफकाम खराब झालेले आहे. याबाबत ग्रामपंचायत गोलिवडेने इमारत निर्लेखन करणेबाबतचा ग्रामसभा ठराव क्र.७६ , दि. २६/०१/२०१४ व मासिक सभा ठराव क्रं.९१ दि. २४/१/२०१४ रोजीने ठराव पारीत केलेला आहे.

कार्यकारी अभियंता,(बांधकाम विभाग), जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीला भेगा पडल्या आहेत व रुफकाम खराब झालेले असून बांधकाम भविष्यात धोकादायक झालेने ते पाडण्यास हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. निर्लेखनानंतर जुन्या साहीत्याचा लिलाव करून ती रक्कम ग्रामपंचायत फंडात जमा करणेत येणार आहे. प्रस्तावित इमारतीचे निर्लेखन करून त्याठिकाणी नव्याने ग्रामपंचायत इमारत बांधणेचे ग्रामपंचायत वारनूळ, ता. पन्हाळा यांनी ठरविलेले आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सा. बां. विभाग, कोल्हापूर यांचेकडून सदर बांधकाम भविष्यात कार्यालयीन वापरास अयोग्य असलेबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल जा.क्र.

रेशा/४४७२/२०१५,दि. ०२/०७/२०१५ ने कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे सादर केलेला आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत गोलिवडे, ता. पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरचे निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.सौ.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.११ :- ग्रा.पं. हळदी ता.करवीर कडील शिवाजी तालिम इमारत निर्लेखन बाबत. (ग्रामपंचायत)**
**ठराव क्र.२६९ दिनांक - ०६/०१/२०१८**

ग्रामपंचायत हळदी, ता. करवीर कडील ग्रामपंचायत मालकीची मिळकत नं मधील शिवाजी तालिम इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक ग्रा.पं. हळदी, ता. करवीर यांचेकडून दि. ३०/६/२०१६ रोजी गट विकास अधिकारी, पं.स. करवीर यांचेकडे प्राप्त झालेला आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेकडे दि. २९/१२/२०१८ रोजी निर्लेखन शिफारस प्रस्ताव सादर झालेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत **सन १९७४** साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारतीच्या भिंतीला तडे गेलेले आहेत व रूफकाम मोडकळीस आलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत हळदीने इमारत निर्लेखन करणेबाबतचा मासिक सभा ठराव क्र. २१/८, दि. २०/०५/२०१६ सदर इमारत निर्लेखन करणेस मान्यता दिलेली आहे.

कार्यकारी अभियंता,(बांधकाम विभाग), जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या भिंतीला तडे गेलेले आहेत व रूफकाम मोडकळीस आलेले असून बांधकाम भविष्यात धोकादायक झालेने ते निर्लेखन करणेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. निर्लेखनानंतर जुन्या साहीत्याचा लिलाव करून ती रक्कम ग्रामपंचायत फंडात जमा करणेत येणार आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सा. बां. विभाग, कोल्हापूर यांचेकडून सदर बांधकाम भविष्यात कार्यालयीन वापरास अयोग्य असलेबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल जा.क्र. रेशा/वशि११४/जाक्र१२५/२०१७,दि. ०८/०३/२०१७ ने कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे सादर केलेला आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत हळदी, ता. करवीर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरचे निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.सौ.संध्याराणी विलास बेडगे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१२:- पंचायत समिती हातकणंगले कडील सभापती निवासस्थान भाडे प्रस्ताव मतूरी बाबत (सा.प्र.)**
**ठराव क्र.२७० दिनांक - ०६/०१/२०१८**

**मा.सौ. रेश्मा पापालाल सनदी सभापती**, पंचायत समिती **हातकणंगले** यांनी दि. ०१/०४/२०१७ पासून तनुजा फरिद शेख रा. हातकणंगले ता.हातकणंगले याची इमारत सभापती निवासस्थानासाठी भाडेने घेतलेली होती. त्याप्रमाणे भाडे मंजूरीची मागणी केली आहे.

**मा. सौ. रेश्मा पापालाल सनदी सभापती**, पंचायत समिती **हातकणंगले** यांनी सभापती निवासस्थानासाठी घेतलेल्या इमारतीचे भाडे र.रु. ५१२१/- दरमहा निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी

अभियंता (बांधकाम) जि.प. कोल्हापूर यांचेकडील पत्र क्रं. ZP/WD/DB/WS/८३५/२०१७ दिनाक ०८/१२/२०१७ अन्वये प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार प्रत्येक पंचायत समिती सभापतीस भाडे न घेता सुसज्ज असे निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमास अधिन राहून जि.प. स योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता देता येईल अशी तरतूद आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसीडी/१०८३/ सीआर/५५/१३, दि. १८ मार्च १९८६ अन्वये मा. अध्यक्षसो यांना २०० चौ.मी. व जि.प. चे विषय समित्यांचे सभापती व पं.स. चे सभापती यांना १५० चौ.मी. पेक्षा अधिक असणार नाही या प्रमाणे कळविले आहे.

**मा. सौ. रेश्मा पापालाल सनदी सभापती** पंचायत समिती **हातकणंगले** यांनी सभापती निवासस्थानासाठी तनुजा फरिद शेख रा. हातकणंगले ता.हातकणंगले यांचे मालकीचे घर भाडयाने घेतलेले आहे. ह्या इमारतीस र.रु. ५१२१/- (अक्षरी रुपये- पाच हजार एकशे एकवीस फक्त)दरमहा भाडे निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी जा. क्रं. ZP/WD/DB/WS/८३५/२०१७ दिनाक ०८/१२/२०१७ ने प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील नियम ६९(२)मधील तरतुदीनुसार सदर भाडे मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. सदर निवासस्थान भाडे प्रस्तावास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१३ :- पंचायत समिती कागल कडील सभापती निवासस्थान भाडे प्रस्ताव मतूरी बाबत (सा.प्र.).**
**ठराव क्र. २७१** **दिनांक - ०६/०१/२०१८**

**मा. सौ. कमल रघुनाथ पाटील सभापती,** पंचायत समिती **कागल** यांनी दि.१४/०३/२०१७ पासून श्री. बाळासो बन्नू कलावंत (कागलकर) मु.पो. कागल ता.कागल याची इमारत सभापती निवासस्थानासाठी भाडेने घेतलेली होती. त्याप्रमाणे भाडे मंजूरीची मागणी केली आहे.

**मा. सौ. कमल रघुनाथ पाटील सभापती,** पंचायत समिती **कागल** यांनी सभापती निवासस्थानासाठी घेतलेल्या इमारतीचे भाडे र.रु. ५३२५/- दरमहा निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प. कोल्हापूर यांचेकडील पत्र क्रं. ZP/WD/DB/WS/८५१/२०१७ दिनाक १४/१२/२०१७ अन्वये प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदी नुसार प्रत्येक पंचायत समिती सभापतीस भाडे न घेता सुसज्ज असे निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबत जे नियम करील त्या नियमास अधिन राहून जि.प. स योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता देता येईल अशी तरतूद आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसीडी/१०८३/ सीआर/५५/१३, दि. १८ मार्च १९८६ अन्वये मा. अध्यक्षसो यांना २०० चौ.मी. व जि.प. चे विषय समित्यांचे सभापती व पं.स. चे सभापती यांना १५० चौ.मी. पेक्षा अधिक असणार नाही या प्रमाणे कळविले आहे.

**मा. सौ. कमल रघुनाथ पाटील सभापती,** पंचायत समिती **कागल** यांनी सभापती निवासस्थानासाठी श्री. बाळासो बन्नू कलावंत (कागलकर) मु.पो. कागल ता.कागल यांचे मालकीचे घर भाडयाने घेतलेले आहे. ह्या इमारतीस र.रु. ५३२५/- (अक्षरी रुपये- पाच हजार तीनशे पंचवीस फक्त) दरमहा भाडे निश्चित केले असून त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी जा. क्रं. ZP/WD/DB/WS/८५१/

२०१७ दिनाक १४/१२/२०१७ ने प्रमाणपत्र दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील नियम ६९(२)मधील तरतुदीनुसार सदर भाडे मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. सदर निवासस्थान भाडे प्रस्तावास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजुरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१४ :- हुपरी नगरपरिषद हुपरीचे प्रशासकीय इमारतीसाठी आपले केंद्रीय प्राथमिक शाळा हुपरी येथिल खोल्या मिळणे बाबत (प्रा.शिक्षण)**

**मा.अरुणराव इगवले :-** हुपरी नगरपरिषदेस किती खोल्या व किती वर्षासाठी देणार आहात?

**मा.शिक्षणाधिकारी (प्राथ) :-** याकार्यालया वापरासांठी ७ रिकाम्या खोल्या ३ वर्ष कालावधीसाठी देणेत येणार आहेत.याकामी बांधकाम विभागाकडून भाडे प्रमाणित केले असून दरमहा रक्कम रु. १३,००७ /- या प्रमाणे भाडे वसुल करणेत येणार आहे.

**मा.अरुणराव इगवले :-** इचंलकरंजी येथिल हवामहल बंगला या जि.प च्या मालमत्ते बाबत फार वाईट अनुभव आला आहे.या शाळा खोल्याबाबत नियमानुरुप कार्यवाही केली जाईल याची शिक्षण विभागाने दक्षता घ्यावी.

**मुख्याधिकारी हुपरी नगरपषिद :-** याकामी जिल्हा परिषदेला भविष्यात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत यांची दक्षता घेत आहोत.

**मा.राहुल आवाडे :-** हुपरी प्राथमिक आरोग्य केद्रांचे पुढे काय?

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** हा विषय आरोग्य समिती मध्ये घेत आहोत.

**ठराव क्र. २७२** **दिनांक - ०६/०१/२०१८**

मुख्याध्याधिकारी हुपरी नगरपरिषद हुपरी यांचेकडील पत्र क्र. हु.न.प./नि.वि./७६९/२०१७ दि. २६/१२/२०१७ अन्वये नगरपरिषदेचे कामकाज करणेसाठी केंद्रीय प्राथमिक विद्यालय हुपरी ता.हातकणंगले येथील प्राथमिक शाळेच्या खोल्यांची मागणी केली आहे. शासनाचे दि.११/४/२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार हुपरी ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपरिषद हुपरी मध्ये करणेत आले आहे. सदर नगरपरिषद हुपरीचे कामकाज सध्या तत्कालीन ग्रामपंचायतीचे इमारतीत सुरु आहे. फक्त दोन खोल्या असलेल्या इमारतीमध्ये नगरपरिषद हुपरीचे कामकाज करताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. नगरपरिषदेकडे उपलब्ध स्टाफसाठीही सध्याची इमारत अपूरी पडत आहे. नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. निवडून आलेल्या नगराध्यक्ष, नगरसेवक आदि पदाधिकारी यांचे नगरपरिषद कामकाज करणेसाठी जागाच नसलेने पुढील कामकाज करणे अत्यंत कठीण बनले आहे, असे पत्रात नमूद केले आहे.

परंतू, शाळा व्यवस्थापन समिती ठराव क्रमांक १६ दि.२८/७/२०१७ नुसार केंद्रिय प्राथमिक शाळा हूपरी या प्राथमिक शाळेच्या खोल्या नगरपरिषदेस देणेत येवू नये असा ठराव संमत करणेत आला आहे. -नगरपरिषदेचे ऑफिस कामकाज म्हटल्यावर संपूर्ण गावाचा संबध ऑफिस कामाच्या संदर्भात येणार असलेने लोकांची सदैव वर्दळ असणार आहे. तसेच येणा-या लोकांच्या दुचाकी,चारचाकी गाडयांचा आवाज यासर्वांचा परिणाम शालेय कामकाजावर होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही अनेक समस्या निर्माण होणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या गोंगाटाचाही त्रास नगरपरिषदेच्या कामकाजावर होणार आहे.या सर्व गोष्टींचा विचार करुन नगरपरिषदेला खोल्या न देण्याचे सर्वानुमते ठरले असा शाळा व्यवस्थापन समितीने ठराव संमत करणेत आला आहे.

तरी सदरच्या विषयाबाबत स्थायी समिती सभेमध्ये चर्चा होवून केंद्रिय प्राथमिक शाळा हूपरी ता.हातकणंगले या शाळेच्या रिकाम्या अवस्थेत असलेल्या ७ खोल्यांचे भाडे बांधकाम विभाग, जिल्हा परिषद

कोल्हापूर यांनी ठरवून दिलेप्रमाणे रक्कम रुपये १३,००७/-(अक्षरी रक्कम रुपये - तेरा हजार सात फक्त) दरमहा आकारुन पुढील तीन वर्षाकरीता हुपरी नगरपरिषद हुपरी यांचे कार्यालयास देणेबाबतचा ठराव मंजूर करणेत आला.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१५ :- ग्रामसेवक पदी नियमित केलेल्या कंत्राटी ग्रामसेवक यांना सुरक्षा ठेव रक्कम परत करणे बाबत.(ग्रा.पं)**

**ठराव क्र. २७३** **दिनांक - ०६/०१/२०१८**

ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत ग्रामसेवक पदी कंत्राटी पध्दतीवर रिक्त पदाच्या अनुषंगाने सरळसेवेने पदे भरणेची कार्यवाही करणेत येते. ग्रामसेवक हा ग्राम पंचायतीकडे सचिव या नात्याने काम करीत असल्याने व शासनाच्या थेट निधी हा ग्राम पंचायतीकडे देणेत येत असलेने, सुरक्षतेच्या दृष्टीने शासनाने विहित केलेल्या नियमानुसार कंत्राटी ग्रामसेवक पदी नियुक्ती देणे पुर्वी उमेदवाराकडून सुरक्षा ठेव रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) जिल्हा परिष ठेव खाती भरणा करुन घेतली जाते.

कंत्राटी ग्रामसेवक पदी नियुक्ती केलेल्या उमेदवारांकडून सुरक्षा ठेव रक्कम भरणा करुन घेतलेली असून, सदरील रक्कम ह्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे डिपॉझीट खाती जमा आहेत.

शासन दिनांक ९/९/२०१० च्या पत्रान्वये, कंत्राटी ग्रामसेवक यांनी वैयक्तीक कारणास्तव राजीनामा दिलेस तसेच कंत्राटी कालावधी यशस्विरित्या पूर्ण करुन नियमित पदावर सामावून घेतलेनंतर, त्यांनी आर्थिक अनियमीतता केली नसलेबाबत व ग्राम पंचायतीचे लेखे योग्य ठेवलेची खात्री करुन, त्यांना त्याची सुरक्षा ठेव रक्कम परत करणेबाबत कळविले आहे.

वित्त विभागाने सुरक्षा ठेव रक्कमेस तीन वर्षाचा कालावधी पुर्ण झालेने, सदरील रक्कम सबंधितास अदा करणे करीता स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी कळविले आहे. त्यानुसार नियमीत झालेल्या खालीलप्रमाणे ३२ कर्मचा-यांना सुरक्षा ठेव रक्कम आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | तालुका | नियमित / राजीनामा दिनांक | सुरक्षा ठेव मंजूर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.रणजित बाजीराव कुरणे | गगनबावडा | ३.३.२०१२ | र.रु.१०,०००/- | |
| २. | श्री.उदय राजाराम पाणारी | कागल | २०.४.२०१३ | र.रु १०,०००/- | |
| ३. | श्री.सुरज दिनकर गुंडप | कागल | ९.६.२०१३ | र.रु १०,०००/- | |
| ४. | श्री.बाजीराव भिमराव देसाई | कागल | २२.९.२०१४ | र.रु १०,०००/- | |
| ५. | श्री.भिवाजी कृष्णात बचाटे | कागल | २९.१२.२०१४ | र.रु १०,०००/- | |
| ६. | श्री.शहाजी राणोजी माने | कागल | ६.८.२०१६ | र.रु १०,०००/- | |
| ७. | श्रीम.सुनिता प्रकाश वगरे | कागल | ११.४.२०१५ | र.रु १०,०००/ | |
| ८. | श्री.रणजीत महादेव विभुते | कागल | ८.८.२०१६ | र.रु १०,०००/ | |
| ९. | श्रीम.आशा ज्ञानोबा घुगे | करवीर | २१.७.२०१५ | र.रु १०,०००/- | |
| १०. | श्रीम.रुपाली शिवाजी पोवाळकर | करवीर | ६.९.२०१५ | र.रु १०,०००/- | |
| ११. | श्री.शरद केरबा पाटील | करवीर | २.११.२०१५ | र.रु १०,०००/ | |
| १२. | श्री.राजाराम कृष्णात पाटील | करवीर | २.११.२०१५ | र.रू.१०,०००/- | |
| १३. | श्रीम.सुनिता मारुती पावसकर | करवीर | १२.३.२०१६ | र.रु १०,०००/- | |
| १४. | श्रीम.सुरेखा अमित जांबिलकर | करवीर | १३.६.२०१६ | र.रु १०,०००/- | |
| १५. | श्रीम.अश्विनी हंबीरराव पाटील | करवीर | ५.७.२०१६ | र.रु १०,०००/- | |
| १६. | श्री.शिवाजी गोविंद वाडकर | करवीर | १७.१२.२०१६ | र.रु १०,०००/ | |
| १७. | श्री.दत्तात्रय यशवंत धनकर | करवीर | १.१.२०१७ | र.रु १०,०००/ | |
| १८. | श्री.औदुंबर ज्ञानोबा शिंदे | शिरोळ | १६.७.२०१३ | र.रु १०,०००/ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९. | श्री.कुमार जोतिबा वंजीरे | हातकणंगले | १८.२.२०१७ | र.रु १०,०००/ | |
| २०. | श्री.प्रभाकर शिवाजी परीट | हातकणंगले | २६.१२.२०१६ | र.रु १०,०००/ | |
| २१. | श्री.अरुण गणपती दबडे | भुदरगड | २२.९.२०१४ | र.रु.१०,०००/- | |
| २२. | श्री.संभाजी नामदेव गुरव | आजरा | २५.१०.२०१५ | र.रु १०,०००/ | |
| २३. | श्री.सुधीर सुभाषराव मुसणे | चंदगड | ८.२.२०१२ | र.रु १०,०००/ | |
| २४. | श्री.मंगेश लिंबाजी केंगले | चंदगड | २३.७.२०१५ | र.रु १०,०००/ | |
| २५. | श्री.राजाराम हरिबा घाटगे | शाहुवाडी | २५.१२.२०१५ | र.रु १०,०००/ | |
| २६. | श्री.शांतीनाथ मारुती सुर्यवंशी | शाहुवाडी | २५.१२.२०१५ | र.रु..१०,०००/- | |
| २७. | श्री.अरुण सखाराम वाचचळ | शाहुवाडी | २५.१२.२०१५ | र.रु.१०,०००/- | |
| २८. | श्रीम.शोभा राजाराम पाटील | शाहुवाडी | २७.६.२०१६ | र.रु.१०,०००/- | |
| २९. | श्री.संभाजी बाबुराव चौगुले | शाहुवाडी | १८.६.२०१३ | र.रु.१०,०००/- | |
| ३०. | श्री.संजय जीवाजीराव शिंदे | शाहुवाडी | १४.३.२०१५ | र.रु.१०,०००/- | |
| ३१. | श्रीम. गायत्री विजय जाखलेकर | शाहुवाडी | १४.९.२०१५ | र.रु.१०,०००/- | |
| ३२. | श्री.सागर गुंडू पोवार | कागल | १५.९.२०१४ | र.रु.१०,०००/- | राजीनामा |

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१६ :- जिल्हा परिषद स्वनिधीचे पुर्नविनियोजन करणे बाबत. (ग्रा.पं)**

**ठराव क्र. २७४** **दिनांक - ०६/०१/२०१८**

कोल्हापूर जिल्हा परिषदेने स्वनिधीतुन सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात ग्रामपंचायत विभागास २५१५-१०३-संकीर्ण-अ २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत सर्व शासकिय योजना सर्वोत्कृष्ट राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देणे करीता र.रू.१८,००,०००/-(अक्षरी आठरा लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आलेली आहे.

सर्व शासकिय योजना सर्वोत्कृष्ट राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देणे र.रू. १८,००,००/- ही रक्कम सदर योजनेसाठी नियम व अटी यांचे निश्चित नाही त्यामुळे निधी अखर्चित राहणार आहे. त्या अनुषगांने सदर योजनेचा एकूण अखर्चित निधी र.रू.१८,००,०००/- (अक्षर र.रू.आठरा लाख फक्त) शिल्लक राहणार असून सदरचा अखर्चित निधी या विभागांतर्गत अन्य योजनेवर वर्ग करणे आवश्यक आहे.त्याअनुषगांने सदर योजनेचा अखर्चित निधी जिल्हा परिषद स्वनिधीतून मुळ अंदाजपत्रकात असलेली योजना २५१५-८००-संकीर्ण-अ २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत यशवंत सरपंच पुरस्कार योजना (रोख परितोषिक) मूळ तरतूद ८,००,०००/- केलेली आहे. सदर योजनेचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षासाठी पुरस्कार देणेचे आहेत. सदर योजनेस दोन वर्षासाठी रोख परितोषिक,सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व पुरस्कार वितरण कार्यक्रम इत्यादी बाबीसाठी एकूण अंदाजित तरतूद १६,००,०००/- इतकी आवश्यक आहे. तरी सदर योजनेस ८,००,०००/- इतकी जादा तरतूद आवश्यक आहे तरी सर्व शासकिय योजना सर्वोत्कृष्ट राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देणे अखर्चित निधी पैकी र.रू.८,००,०००/- (अक्षरी र.रू. आठ लक्ष ) इतकी रक्कम यशवंत सरपंच पुरस्कार योजना (रोख परितोषिक) वर्ग करणेस जिल्हा परिषद स्थायी सभा शिफारस व मान्यता सर्वानुमते देत आहे.

सुचक :- मा.श्री.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.सौ.शुभांगी रामचंद्र भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१७ :- वि.मं.पोहाळे / बोरगांव ता.पन्हाळा या शाळेची ४ खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. २७५** **दिनांक - ०६/०१/२०१८**

वि.मं.पोहाळे/बोरगांव ता. पन्हाळा येथील ०४ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२१ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०४ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | वि.मं.पोहाळे /बोरगांव | ०४ | १९५७ | ६० | समाज विकास योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०४ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.सौ.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१८ :- वि.मं.पोहाळेवाडी ता.पन्हाळा या शाळेची २ खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**
**ठराव क्र. २७६** **दिनांक - ०६/०१/२०१८**

वि.मं.पोहाळवाडी ता. पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील २ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२५ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | वि.मं.पोहाळवाडी | ०२ | १९५३ | ६४ | लोकल फंड व खडूफळा योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०२ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१९ :- वि.मं.खेरीवडे ता.पन्हाळा या शाळेची २ खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. २७७** **दिनांक - ०६/०१/२०१८**

वि.मं.खेरिवडे ता. पन्हाळा येथील ०२ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२२ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | वि.मं.खेरीवडे | ०२ | १९८५ | ३२ | N.R.E.P |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०४ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२० :- वि.मं.फये ता.भुदरगड या शाळेची २ खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. २७८** **दिनांक - ०६/०१/२०१८**

वि.मं.फये ता. भुदरगड या शाळेच्या ०२ येथील प्राथमिक शाळेतील २ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. भुदरगड गटांकडून खाली नमूद केलेल्या

शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२३ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुदरगड | वि.मं.फये | ०२ | १९८७ | ३० | जिल्हा परिषद योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०२ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.सौ.संध्याराणी विलास बेडगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२१ :- वि.मं.तेरसवाडी ता.करवीर या शाळेची १ खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**
**ठराव क्र. २७९** **दिनांक - ०६/०१/२०१८**

वि.मं.तेरसवाडी ता. करवीर या शाळेची ०१ खोली निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. करवीर गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२६ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०१ खोली निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | करवीर | वि.मं.तेरसवाडी | ०१ | १९६५ | ५२ | शासकीय योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०१ खोली निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२२ :- केद्रीय प्राथमिक शाळा येळवण जुगाई ता.शाहूवाडी या शाळेच्या सहा (०६) खोल्या निर्लेखन करणे बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. २८०** **दिनांक - ०६/०१/२०१८**

केंद्रिय प्राथमिक शाळा ता. शाहुवाडी येथील प्राथमिक शाळेतील ६ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. शाहुवाडी गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता ,सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा ठराव क्र-१२४ दि.२२/१२/२०१७ अन्वये ०६ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी समिती मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेची मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.न | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाहुवाडी | केंद्रिय पाथमिक शाळा येळवण जुगाई | ०६ | १९६३ | ५४ | डोंगरी विकास योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०६ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.सर्जेराव बंडू पाटील (पेरिडकर)
अनुमोदक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२३ :- प्रलंबित प्रवासभत्ते, रजा प्रवास सवलत देयके मंजूरी बाबत. (प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.२८१** **दिनांक - ०६/०१/२०१८**

प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर कडील कर्मचारी १) श्री.एस.जी.लांबोरे, तत्का.वा.चालक यांची माहे एप्रील २०१२ ते मार्च २०१३ अखेर प्रलंबित प्रवासभत्ते देयके र.रु.१८९६०/- २) श्री.एस.सी.पाटेकर, क.सहायक यांची माहे एप्रील २०१३ ते डिसेंबर २०१४ अखेरची प्रलंबित प्रवासभत्ते देयके र.रु.१५८८५/- ३) श्री.संजय दगडू पाटील, क.सहा यांचे रजा प्रवास सवलत देयक र.रु.६५४०/-, ४ ) श्री.राजेंद्र

बाळासो वणकुद्रे, क.सहायक यांचे रजा प्रवास सवलत भत्ते देयक र.रु.७९७४/- यांची तीन वर्षावरील देयके प्रलंबित आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ मधील प्रकरण दोन मधिल क्र.४५ नुसार तिन वर्षाहुन जुनी असतील अशी सर्व देयके आदा करणेसाठी शिक्षण समिती कडील सभा ठराव क्र.१३० दिनांक-२०/१२/२०१७ अन्वये मंजूर मिळालेली असून सदरच्या विषयास स्थायी समितीची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२४ :- जिल्हा ग्राम विकास निधीतून ग्रा.पं. कुंभोज ता.हातकणंगले यांना जिल्हा ग्रामविकास निधीतून ग्रामसचिवालय बांधकाम करणेसाठी कर्ज मंजूर करणे बाबत.(ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. २८२** **दिनांक - ०६/०१/२०१८**

खाली नमूद केले ग्रामपंचायतीला खालील अटीस अधीन राहून कर्ज मंजूरी स्थायी समिती शिफारस करत आहे.

| अ.क्र | ग्राम पंचायत व तालूक्याचे नांव | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम /मागणी रक्कम | ७५%प्रमाणे होणारी रक्कम **(जि.ग्रा.वि.नि)** | कर्ज मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कुंभोज तालुका हातकणंगले | ग्रामसचिवालय बांधकाम करणे | ९३,१२,००१/- १४ वा वित्त आयोग १०,००,०००/ जि.ग्रा.वि.नि- ८३,१२,००१/- | ६२,३४,०००/- | ६२,३४,०००/- |

२/- वरील ग्राम पंचायतीना खालील अटीस अधिन राहून कर्ज मंजूरीची शिफारस करणेत येत आहे.

**१.**ग्राम पंचायतीने एकूण अंदाजपत्रकाच्या २५%रक्कम ग्राम पंचायत स्वतःच्या फंडातून खर्च करेल, व ७५% रक्कम ही जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मिळेल.
२. कर्ज ज्या कारणासाठी मंजूर केलेले आहे. त्याच कारणासाठी वापर करणेत यावा. दुसरीकडे खर्च करु नये.
३. कर्ज १० वर्षाच्या मुदतीत परतफेड करणेचे आहे. व्याजाचा दर द.सा.द.शे ५ % आहे. थकीत मुद्दल व व्याज या दोहोच्या थकलेल्या हप्त्यावर ५% खेरीज द.सा.द.शे २ % दराने दंडणीय व्याज आकारण्यात येईल.
४. कर्ज परत फेड करण्यासाठी ग्राम पंचायतीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात यावी.
५. सदर ग्राम पंचायतीचे तीन वर्षाचे सरासरी शिल्लक उत्पन्न पाहून कर्ज मंजूर करणेस शिफारस करणेत आलेली आहे.
६. नियोजित जागा ही ग्रामपंचायतीच्या मालकीची असावी.

ग्राम पंचायत कुंभोज तालुका हातकणंगले याना वरील अटीस अधीन राहून ग्रामसचिवालय बांधकाम करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधी मधून कर्ज मंजूर करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.श्री.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.अरुणराव इंगवले :-** पंचायत समिती आवारा मधील झाडे पाडली आहेत.

**मा.सभापती शिक्षण:-** गट विकास अधिकारी यांना परवानगी दिलेली नाही.

**मा.मु.का.अ :-** कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी काय वस्तुस्थिती आहे याची माहीती घ्यावी.

**मा.अरुणराव इंगवले :-** साजणी येथिल जुन्या नळ पाणी पुरवठा योजनेचे मूल्यांकन व हस्तातंरण झालेले नाही.

**मा.राहुल आवाडे :-** मुरुम व योजना मूल्यांकन का होत नाही?

**कार्यकारी अभियंता ग्रापापु :-** करुन घेत आहोत.

**मा.राहुल आवाडे :-**मुरुमाचे पण बघा.

**सभापती महिला व बाल कल्याण समिती :-** हेरवाड योजने बाबत काय झाले? पुढील सभेला माहीती दया.

**कार्यकारी अभियंता ग्रापापु:-** अदयापी चौकशी पूर्ण झालेली नाही.करुन घेत आहे.

**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक- निंबाळकर :-** शिरोळ ग्रामपंचायतीन गायरान बाबत केलेला ठराव चुकीचा आहे.ही जागा ट्रस्टची आहे.

**मा.मु.का.अ :-** उप.मु.का.अ ग्रामपंचायत यांनी चौकशी करुन हा विषय स्थायी पुढे ठेवावा.कोल्हापूर ॲपल मार्फत कॅन्सर तपासणी मोहीम हाती घेणेत येणार असून घरोघरी भेटी देवून संशयित रुग्ण तपासणी करणार आहोत.प्राथमिक आरोग्य केद्राचे वैदयकिय अधिकारी यांचे मार्फत तालुक्यात शिबीरे घेणार आहोत.

**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक- निंबाळकर :-** यासाठी प्रत्येक कॉलेजच्या NSS कॅम्पला बोलवावे.आम्हांला त्याची मदत होईल.

**मा.मु.का.अ :-** हा उपक्रम सर्वत्र राबविला जाणार असून करवीर व शिरोळ तालुक्यात यांची जास्त गरज आहे.यासाठी मा.पालकमंत्री व खासदार निधि उपलब्ध करुन देणार आहेत.

**मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक- निंबाळकर :-** मा.पालकमंत्री व खासदार याचे अभिनंदन.

**शिक्षणाधिकारी प्राथमिक :-** शिंगणापूर येथिल श्री.पानारी यांनी विदयार्थ्यासाठी खाजगी प्रशिक्षण केद्र सुरु केले असून जिल्हा परिषदेच्या क्रिडा प्रशालेचे साहीत्य व मैदान त्यांच्या मुंलाना वापरणेस देणेस मागणी केली आहे.ते आजच्या सभेस उपस्थित आहेत.

**मा.मु.का.अ :-** शिक्षण समितीमध्ये याबाबत प्रथम चर्चा करु .जिल्हा परिषदेच्या क्रिडास्पर्धा दिनांक २९.१.२०१८ ते ३१.१.२०१८ या कालावधीत आयोजित केलेल्या आहेत.क्रिकेटचे सामने दिनांक ८ ते १२ तारखेदरम्यान असून उर्वरीत खेळ दिनांक २९.१.१८ ते ३१.१.१८ या कालावधीत होणार आहेत.दिनांक ३० व ३१-रोजी अपंग कल्याण आयुक्त येणार असून वारणानगर येथे अपंग उपचार शिबीर आयोजित केले आले आहे.दिनांक १५ व १६ रोजी जि.प आवारात पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केले आहे.तरी सदर पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.

**विषय क्र.२५ :- जि.प. दवाखाना कुरूंदवाड ता.शिरोळ जि. कोल्हापूर येथील जि.प. दवाखाना यड्राव ता.शिरोळ येथे स्थलांतर करणे बाबत.(आरोग्य)**

**ठराव क्र.२८३** **दिनांक - ०६/०१/२०१८**

आरोग्य विभागाकडील जिल्हा परिषद, मौजे कुरुंदवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथे जि. प. दवाखाना कार्यरत आहे. त्यानुसार जि. प. दवाखाना कुरुंदवाड हा दवाखाना यड्राव येथे स्थलांतरण करणेबाबत प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुसार प्रा. आ. केंद्र नृसिंहवाडी हेरवाड तेरवाड बहिरेवाडी, बस्तवाड ही गावे ग्रामीण रुग्णालय शिरोळ जवळ आहेत. व शिराढोण, टाकवडे, कोंडीग्रे जाभळी, चिपरी ही गावे यड्रावजवळ आहेत. मौजे यड्राव हे मध्यवर्ती ठिकाण आहे. सध्या लोकसख्या २५,००० हजार चे वर असून औधौगिक परीसर असलेने अपघातांचे प्रमाण जास्त आहे. सबब यड्राव येथे जि. प. कुरुंदवाड अंतर्गत २ कि. मी. अंतरावर नृसिंहवाडी प्रा. आ. केंद्र आहे. तसेच अंदाजे ६ ते ७ किलोमिटर ग्रामीण रुग्णालय शिरोळ आहे. जि. प. दवाखााा कुरुंदवाड अंतर्गत येणा-या वरील सर्व गावांना यड्राव हे वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत सोयीस्कर असे मध्यवर्ती ठिकाण आहे. तसेच ग्रामपंचायत यड्राव हे वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत सक्षम अशी ग्रामपंचायत असून जि. प. दवाखानाकरीता आवश्यक ती आरोग्यविषयक सुविधा पुरविणेस तयार आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर

केलेला आहे. तरी जि. प. दवाखाना मौजे कुरुंदवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर यड्राव येथे स्थलांतरण करणेबाबत आरोग्य समिती सभेची मान्यता घेणेत आली आहे. तसेच जि. प. दवाखाना मौजे कुरुंदवाड ता. शिरोळ जि. कोल्हापूर मौजे यड्राव येथे स्थलांतरण करणेबाबत स्थायी समिती सभेची मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर

अनुमोदक :- मा.श्री.राहुल प्रकाश आवाडे

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२६ :- नाविन्यपूर्ण योजना (कॅन्सर पूर्व लक्षणे व कॅन्सर रूग्ण शोध मोहिम) सन २०१७-१८ जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर योजना बाबत. (आरोग्य)**

**ठराव क्र.२८४** **दिनांक - ०६/०१/२०१८**

जिल्हा नियोजन समिती कडून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत शिरोळ तालुकयामध्ये कॅन्सर पूर्ण लक्षणे व कॅन्सर रूग्ण शोध मोहिम या योजनेस जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकिय मंजूरी मिळाली आहे. योजनेचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | मंजूर अनुदान | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कॅन्सर पूर्व लक्षणे व कॅन्सर रूग्ण शोध मोहिम | २७.८० लाख | |

प्रस्तावित नाविन्यपूर्ण योजनेस प्रशासकिय मान्यता व अनुदान जिल्हा नियोजन समिती सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्राप्त झाले आहे. तरी सदर योजना अवलोकनी येवून अंम्मलबजावणीस स्थायी समिती मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर

अनुमोदक :- मा.सौ.शुभांगी रामचंद्र शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर मा.उपाध्यक्ष यांनी सभेस उपस्थित असलेले सर्व पदाधिकारी, सदस्य, सर्व अधिकारी व खाते प्रमुख यांचे आभार मानले. तद्नंतर मा.अध्यक्ष यांनी सभा खेळीमेळीत चालवणेस सहकार्य केले बद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक ०६/०१/२०१८

Shoumika

**(आर.बी.भालेराव)**
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**(शौमिका महाडिक)**
**सभापती स्थायी समिती तथा**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**